IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.67

Volume 5, Issue 5, February 2025

# ‘खेलंदाजी ’ : खेळातील राजकारण आणि समाजावरील परिणामांचा वेध

**डॉ. सुनिता प्रदिप रंगारी**

**सहयोगी प्राध्यापक, एम. बी. पटेल कॉलेज, देवरी**

**sunitarangari72@gmail.com**

**प्रस्तावना :-**

**‘पढोगे लिखोगे, तो बनोगे नवाब**

**खेलोगे कुदोगे, तो बनोगे खराब |’**

अशी मानसिकता असलेल्या आपल्या देशात आज खेळांत राजकारण मोठ्या प्रमाणावर खेळले जातांना दिसते. कोणताही खेळ हा ‘खेळभावनेने’ खेळायचा असतो ; किंवा खेळ खेळण्याने खेळभावना विकसित होते, असे मानणे कदाचित चुकीचे ठरण्याची शक्यता निर्माण झालेली दिसते. आणि याचे मुख्य कारण म्हणजे खेळांत शिरलेले राजकारण आणि राजकारणी ! ‘आयपीएल’ आणि ‘टी ट्वेंटी’ हे प्रकार क्रिकेट या खेळांत आल्यापासून तो सर्वसामान्यांपेक्षा राजकारण्यांचा व चित्रपट तारक/तारकांचा जास्त झालेला दिसतो. पैशाचा महापूर वाहत असलेल्या हया खेळाचे जसे चांगले परिणाम समाजावर झालेले दिसून येतात, तसेच त्याचे वाईट परिणामही अनेकांना भोगावे लागतात. क्रिकेटच्या नादी लागून आपला अभ्यास करिअर, यांना तिलांजली देणाऱ्या युवकांची जेव्हा मोठ्या स्तरावरील क्रिकेटमध्ये निवड होत नाही ; तेव्हा ते नक्कीच कोलमडून पडतात. क्रिकेटच्या वेडापाई आपलं आयुष्य उद्‌धवस्त केलेल्या युवांच्या कथा गल्लीबोळातून पहायला मिळू शकतात.

एखादा सचीन 'क्रिकेटचा देव' बनतो ; त्याचवेळी एखादा विनोद कांबळी आपलं आयुष्य उद्‌धस्त करून टाकतो. एखादा कुस्तीपटू सुशील कुमार, स्वत:च्या महत्वाकांक्षेपायी नरसिंग यादव सारख्या ऑलिम्पिकमध्ये निवड झालेल्या नवोदित खेळाडूला डोपींग मध्ये अडकवून त्याचे जीवन उद्‌धवस्त करू शकतो.

याशिवाय निवड समिती, पंच, अधिकारी, क्रिडा संघटना यांच्यातील राजकारणाचे ग्रहण सर्वच खेळांना लागलेले दिसून येते. जात, धर्म हे घटक देखील खेळाडूंच्या निवडीसाठी महत्वाचे ठरू लागले आहेत. एकशे चाळीस कोटीच्या देशाला ऑलिम्पिकमध्ये दहा पदकंही मिळू नयेत, ही मोठ्ठी शोकांतिका आहे. राजकारणात खेळातील राजकारणाबरोबरच अर्थकारण देखील आपल्या देशातील खेळाच्या उज्वल भविष्याच्या मार्गातील सर्वात मोठी धोंड आहे.

देशाला खेळांमध्ये जिंकण्यात सातत्य हवे असेल तर खेळाच्या निरंतर विकासासाठी आपसातलं राजकारण सोडून आर्थिक मदत करण्यासाठी अनेकांचे हात पुढे सरसावले पाहिजेत. ती काळाची गरज आहे. 'खेलंदाजी' या पुस्तकांतील विविध लेखांमधून द्‌वारकानाथ संझगिरी यांनी खेळांतील राजकारण, अर्थकारण, यांचा खेळाडूंवर परिणाम होतो, याचे मनोरंजक आणि प्रासादिक भाषेत वर्णन केले आहे. लेखक 'क्रिकेट विश्लेषक व पत्रकार' असल्यामुळे क्रिकेटमधील बदलांवर त्यांनी भाष्य केले आहेच पण सोबतच 'ऑलिंपिक' खेळांमधील बदलाचा, तेथील राजकारणाचा व त्यामुळे होणाऱ्या एकूणच सामाजिक व राष्ट्रीय हानीचा आढावा वाचकास अंतर्मुख करून जातो.

Keywords - क्रिकेट, खेळ, खेळाडू, प्रशिक्षक, संझगिरी, खेलंदाजी

**ध्रुवतारा :**

या लेखात संझगिरींनी सचिनला ध्रुवताऱ्याची उपमा दिली आहे. भारतीय फलंदाजीतील संथपणा त्याने आपल्या आक्रमक वृत्तीने घालवला आणि 'आक्रमकतेला क्षणभंगुरतेचा शाप नसतो', हे त्याने दाखवून दिले. यातुन पुढे सेहवाग, युवराज, विराट कोहली या सारखे आक्रमक खेळाडू उभे

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.67
Volume 5, Issue 5, February 2025

राहिले. गुणवत्ता असेल तर सामान्य कुटुंबातील मुलगाही खेळात किती पुढे जाऊ शकतो, हे सचिनने दाखवून दिले. त्यातून अनेक मराठी माय - बाप आपल्या मुलांसाठी क्रिकेट या खेळाकडे 'करियर' म्हणून बघू लागली. हा एक महत्वपूर्ण बदल सचिनच्या क्रिकेट खेळण्याने झाला. खेळांप्रती एक सकारात्मकता निर्माण झाली. अर्थात हा बदल निश्चितच स्वागतार्ह होता.

**उत्तम मार्गदर्शक :**

क्षेत्र कोणतेही असो, ध्येय गाठायचं असेल तर उत्तम मार्गदर्शक हवा. हा मार्गदर्शक जर मित्र, वडील आणि भावाची भुमिका निभावणारा असेल तर, ध्येय गाठणं सोपं जातं. कसोटी क्रिकेट मधून निवृत्त झाल्यानंतर राहुल द्रविडने कुमार वयातील मुलांना क्रिकेटचे धडे द्यायला सुरूवात केली. संझगिरी त्याबद्दल म्हणतात, "कुमार वयातल्या मुलांसाठी असाच प्रशिक्षक हवा, जो डोक्यावर बर्फाची अख्खी लादी ठेवून निखाऱ्यावरून चालला. आगीशी खेळला आणि स्वत: ज्वाला बनून प्रतिस्पर्ध्याला त्याने भाजून काढले. हे करताना डोक्यावरचा बर्फ वितळला नाही." राहुल द्रविडसारख्या उत्तम मॅनेजमेंट जाणणाऱ्या क्रिडापटूचं मार्गदर्शन हे मैदानावर आणि मैदानाच्या बाहेरही कुमार वयातील मुलांच भविष्य घडवण्यात फार मोठी भूमिका निभावू शकते. या वयातल्या निसरड्या वाटांवरून वाहवत न जाता योग्य मार्गाने विद्यार्थी गेले, तर ते स्वत:चं आणि देशाचंही भविष्य घडवू शकतात.

**स्वास्थ आणि गुणवत्ता :**

क्रिकेट असो किंवा आणखी कोणताही खेळ असो ; तो खेळण्यासाठी योग्य तो आहार विहार आणि व्यायाम याची गरज असतेच असते. देवाने गुणवत्ता दिली असली तरी खेळाडूंनी ती गुणवत्ता वाया जाऊ देऊ नये. याबद्दल रोहित शर्मा या आघाडीच्या फलंदाजाबद्दल बोलतांना संझगिरी

म्हणतात, "पण देव त्या खेळाडूंकडूनही काही अपेक्षा ठेवतो. त्याने बचावावर मेहनत घ्यावी ही अपेक्षा असते, त्याने आपले शरीर नीट ठेवावे, फिटनेस नीट राखावा ही सुद्‌धा त्याची अपेक्षा असते. तो गुणवत्तेचं ताट पुढे ठेवतो, पण तो जेवण भरवत नाही. ते जेवण आपल्याला आपल्या हातानेच जेवायचं असतं. ते जर नीट जेवता नाही आलं, तर मग तो फलंदाज अपयशी होतो आणि त्या गुणवत्तेच्या ताटाचा अपमान करतो"[२]

मिळालेल्या संधींचा योग्य प्रयोग केला नाही, तर असलेल्या गुणांचं सोनं होत नाही. 140 कोटींच्या देशात गुणवान खेळाडूंची कमतरता नाही, पण संधींची कमतरता नक्कीच आहे. त्यामुळे ज्याला संधी मिळते, तो 'भाग्यवानच' म्हटला पाहिजे. पण या भाग्यवंतांनी स्वत:चं फीटनेट राखून नैतिकतेच्या मूल्यांचं जतन केलं पाहिजे.

आयपीएल :

'इंडियन प्रिमीयर लीग' या प्रचंड पैसा देणाऱ्या कंपनीची स्पाँन्सरशीप 'विवो' या चिनी कंपनीकडे आहे. आज सगळीकडे 'पैसा' हाच मोठा झालेला दिसतो आहे. पैशासाठी सर्व नितीमत्ता, धोरणे गुंडाळून ठेवलेली दिसतात. व्यक्तिगत जीवनापासून ते राष्ट्रीय जीवनातही हेच बघायला मिळतं आहे. त्यामुळे तरूण पिढीसमोर कुठलेही 'आदर्श' आज राहिलेले नाहीत. संझगिरी म्हणतात, "मला 'विवो' ला स्पॉन्सरशिप दिल्याबद्‌दल राग नाही. मला राग दांभिकपणाचा आहे. आपल्याकडे सगळ्यांसाठी एकच धोरण नाही. धोरणं सोयीप्रमाणे बदलली जातात आणि शेवटी ती पैशाच्या पायाशी येऊन लोळण घेतात."[3] आजही भारत-पाकिस्तानची क्रिकेट मॅच असेल, तर दोन्ही देशातील नागरिकांच्या उत्साहाला उधान येते. जणू दोन देशांमध्ये युद्‌ध सुरू आहे, अशा आविरभावात मॅच पाहिली जाते, व त्यावरील प्रतिक्रिया दिल्या जातात. पण "आपल्याला आयपीएलमध्ये पाकिस्तानी

खेळाडू चालत नाहीत. का ? कारण पाकिस्तान आपला शत्रू आहे. पण चीन शत्रू असूनही चीनची स्पॉन्सरशिप मात्र चालते."[4]

चीनमधील लोक क्रिकेट खेळत नाहीत. आयपीएल मध्ये एकही चीनी खेळाडू नसतो. स्पॉन्सरशीप मात्र चीनची ! हे चीनचे अर्थकारण आहे. जगातील क्रिकेट खेळणाऱ्या जवळपास सर्वच देशांतील सर्वोत्तम खेळाडू आयपीएल मध्ये क्रिकेट खेळण्यासाठी विकत घेतले जातात. त्यांची अक्षरश: बोली लागते. एके काळी क्रिकेटची अस्मिता असलेली 'रणजी ट्रॉफी' मात्र लोक 'आयपीएल' च्या नादात विसरत चालले आहेत. 'रणजी ट्रॉफी' मध्ये देशातील गल्लीगोळातून आलेला युवा आपले भविष्य आजमावू शकत होता. पण 'आयपीएल' च्या वाढत्या प्रभावामुळे रणजी ट्रॉफीकडे सर्वांचेच पार दुर्लक्ष झालेले दिसते. 'टी-ट्वेंटी' क्रिकेटच्या काळात लवकरच 'कसोटी क्रिकेट' आणि 'वन-डे' क्रिकेटला लोक विसरतील असे दिसते. याबाबतीत तरी 'कालाय तस्मै नम:' असेच म्हणावे लागेल.

**खेळांमधील राजकारण आणि अर्थकारण :**

आपल्या देशतील लोकांना राजकारणाची भयंकर हौस आहे आणि या हौसेचे हव्यासात रूपांतर झाले आहे. 'यत्र-तत्र-सर्वत्र' राजकारण केलं जात आहे. ज्या ठिकाणी पैसा आहे, त्या सर्वच क्षेत्रात राजकारण घुसल आहे, आणि त्यामुळे भ्रष्टाचाराची कीड लागलेली दिसून येते. लोकांच्या भल्यासाठी 'राजकारण' केलं  जात नाही, तर स्वत:ला किती आणि कसं खायला मिळेल याचाच विचार करून राजकारणात प्रवेश केला जातो. आपलीच माणसं, मग ती 'नालायक' का असेनात 'खाण्याच्या' पदांवर बसवली जातात, त्यातून मग रोष निर्माण होतो, गुन्हेगारी वाढते आणि शेवटी कोणत्याही क्षेत्रात जागतिक स्तरावरील मूल्यांकणात देश मागे ढकलला जातो.

'देशात क्रिडा संस्कृती निर्माण व्हायला हवी' हे वाक्य सभांमध्ये बोलण्यासाठी असते ; प्रत्यक्षात त्यासाठी जाणीवपूर्वक काय कृती करायला हवी? हे कोणलाच ठाऊक नसते. 'ऑलिम्पिक' खेळांमध्ये भारताला आजवर मोठी कामगिरी करता आलेली नाही. 'नीरज चोप्रा' ने 2021 च्या

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.67
Volume 5, Issue 5, February 2025

टोकीयो ऑलिम्पिक मध्ये 'भालाफेक' या खेळांत सुवर्णपदक प्राप्त केले. हे पदक त्याने 'फ्लाईंग शिख मिल्खासिंग' ला अर्पण केले. 1960 साली रोम येथे झालेल्या 400 मीटर धावण्याच्या शर्यतीत त्यांना चौथे स्थान प्राप्त झाले होते. त्याआधी त्यांनी राष्ट्रकुल व आशियायी खेळांमध्ये सुवर्णपदकं प्राप्त केली होती. नीरज चोप्रा हा 'फील्ड आणि ट्रॅक' च्या खेळांमध्ये सुवर्णपदक प्राप्त करणारा पहिला खेळाडू ठरला. देशाला स्वातंत्र्य मिळून 78 वर्षाचा कालावधी लोटूनही ऑलिम्पिक पदकांची वानवा आहे.

2012 साली झालेल्या 'लंडन ऑलिम्पिकमध्ये' इंग्लंडला 67 पदक मिळाली होती. त्यावेळचा सुवर्णपदक विजेता अभिनव बिंद्राने इंग्लंडचा खर्च सांगितला होता. 'इंग्लंडला प्रत्येक पदकासाठी 5.5 दशलक्ष पौंड खर्च होतो. असा खर्च केल्याशिवाय पदकं मिळत नाहीत.' अर्थात एका पदकामागे इंग्लंड 50 कोटी खर्च करतो. तुलनेत आपल्या बजेट मध्ये मात्र खेळांसाठी 0.1 टक्के खर्च केला जातो. 'टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम' अंतर्गत 'मेडल' जिंकू शकणाऱ्या प्रशिक्षणाचा व एकूणच सर्व खर्चाचा भार उचलायला सरकारने सुरूवात केली आहे. या प्रयत्नातूनच नीरज चोप्रावर 4.5 कोटी खर्च केले गेले. आणि त्याने सुवर्ण पदक जींकलं. पण या स्तरावर निवड आणि खर्च करण्यापेक्षा शालेय जीवनातूनच क्रिडा संस्कृती रूजवली गेली, आपल्या मुलांच्या क्षमता तपासून त्यानुसार त्यांना खेळू दिले, त्या खेळण्यातून त्यांना सुरूवातीला आनंद आणि फीटनेस मिळाला तर, पुढे पदकं मिळवणं सोपं जातं, असे मत संझगिरींनी 'पण इच्छाशक्ती हवी' या लेखात व्यक्त केले आहेत, आणि ते तथ्यांवर आधारलेले आहेत.

सरकारने खेळांसाठीचं बजेट वाढवण्याची जशी गरज आहे, तशीच खेळांसाठी पुरस्कर्ते देखील समोर आले पाहिजेत, तरच एवढ्या मोठ्या देशातील तरूणाईला खेळता येईल. खाजगी क्षेत्रानेही खेळांमध्ये पैसा लावायला हवा. खेळाडूंना सरकारी नोकरी सोबतच खाजगी कंपन्यांतही नोकऱ्यांची

दारं खुली झालीत तर खेळांकडे जास्त लक्ष दिलं जाईल. संझगिरी म्हणतात, "क्रिकेटमध्ये पैसा कुठून आला? तसं मॉडेल ऑलिम्पिकसाठी तयार करायला हवं. शक्य आहे. इच्छाशक्ती हवी."[5]

आपल्याकडे विविध धार्मिक यात्रा, जत्रा, मेळावे यांच्यासाठी हजारो कोटींची तरतूद केली जाते. पण तालुका, जिल्हा, नगर, राज्य स्तरांवरील खेळांच्या स्पर्धांसाठी काही भरीव तरतूद नसते. 'क्रिकेट' चे सामने भरवले जातात, पण इतर खेळांकडे प्रचंड दुर्लक्ष केले जाते. आजकाल 'कबड्डी' ला थोडे चांगले दिसत आले आहेत असे दिसते. अनेक शाळा-महाविद्यालयांमध्ये खेळांची मैदांन नसतात, आणि बऱ्याच शारीरिक शिक्षण देणाऱ्या अध्यापक-प्राध्यापकांना कशाशीही देणेघेणे नसते. विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून त्यांना त्या पद्धतीने प्रशिक्षण देणारा प्रशिक्षक भेटणे, हे त्या शाळा-महाविद्यालयाचे आणि त्या विद्यार्थ्यांचे 'भाग्यच' म्हणायला हवे ; आणि असे भाग्यवंत फार कमी असतात.

**खेळ आणि जातियता :**

आपल्या देशात 'जातियता' नावाची विषवल्ली माणसांच्या नसांनसांतून वाहतांना दिसते. "जात नाही ती जात' असे म्हटले जाते, ते त्यामुळेच. आपल्याकडे आता जात-पात कोणी मानत नाही, वगैरे वल्गना केल्या जात असल्या तरी ग्रामीण भागात अजूनही खुल्या स्वरूपात जात पाळली जाते आणि शहरात छुप्या पद्धतीने पाळली जाते. जात श्रेष्ठत्वाची भावना अजूनही इथल्या माणसांच्या मनात घर केलेली आहे. क्षेत्र कोणतेही असो ही जात कधीतरी अचानक उफाळून बाहेर येतेच येते. पाश्चिमात्य देशांत वर्णभेद थोड्याफार प्रमाणात असेलही पण तेथील बऱ्याच लोकांना तो नको आहे, आणि तो पाळणाऱ्यांच्या विरोधात तेथील लोक आंदोलनं करतात ; त्यांना वाईट वाटतं.

'खेळ' या क्षेत्रात जात-पात पाहिली जात नाही, असं म्हंटलं जातं ; पण विविध स्तरांवरील निवडीमध्ये आपल्या जातीच्या मुलाची किंवा मुलीची निवड करण्यावर प्रशिक्षकाचा कल दिसून

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.67

Volume 5, Issue 5, February 2025

येतो. आपल्या देशातला पहिला अस्पृश्य क्रिकेटपटू म्हणून ‘बाळू पालवनकर’ यांचं नाव घेतलं जातं. तो काळ इंग्रजांचा होता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ‘क्रिकेट क्लब’ ची स्थापना करून बाळू पालवनकर यांच्या क्रिकेट प्रेमाला खतपाणी घातले होते. पुढे 1911 च्या इंग्लंडच्या दौऱ्यावर जाण्याची संधी त्यांना मिळाली. तेथे त्यांनी आपल्या डावखुऱ्या गोलंदाजीच्या जोरावर 114 बळी घेतले. ‘हिंदु जिमखान्याकडून’ खेळणाऱ्या या खेळाडूला पूर्णपणे ‘अस्पृश्यतेची’ वागणूक दिली जायची. आणि तरीही हा अस्पृश्य माणूस हिंदुंना जिंकून देत असे. पुढे क्रिकेटमध्ये अशी उघड जातीयता पाळली गेलेली दिसली नाही, तरी ती होती. एका कॉमेंट्रीवर सुरेश रैना ने स्वत:चा ‘ब्राम्हण’ असल्याचा अभिमान व्यक्त केला ; मग रविंद्र जडेजाने ‘क्षत्रिय’ असल्याचा! ‘चक् दे इंडिया’ सारख्या चित्रपटांतून जात-धर्माचे वास्तव दाखवले गेले आहे. अजूनही दलित-अस्पृश्य जातीतील मुलांसाठी खेळांची मैदाने खुलेपणाने खुली नाहीत, असे खेदाने म्हणावेसे वाटते. आजचा ‘सोशल मिडीया’ या जात-धर्म-वर्ण भेदाला भरपूर खतपाणी घालतांना दिसतो आहे.

खेळांनी खरेतर खेळभावना रूजवून सामाजिक समतेची व स्वातंत्र्याची वाट सोपी करणे गरजेचे असतांना जातीचं राजकारण त्या खेळांचा ‘खेळखंडोबा’ करण्यासाठी पुरेसं ठरतं आहे.

**खेळ आणि महिला :**

आज मोठ्या प्रमाणात मुली विविध खेळांमध्ये नाव कमवतांना दिसतात. पण बहुधा मुलींच्या खेळण्याबाबत समाजात अनास्था दिसून येते. वयात आलेल्या मुलींच्या बाबतीत विशेषत: ग्रामीण भागातील मुलींच्या खेळण्याबद्दल खूपच अडचणी येतात. खेळण्यासाठी योग्य कपडे, जुते, वातावरण, प्रशिक्षक, प्रवास, खर्च आणि त्यांचे व्ययक्तिक आरोग्य व पाळीच्या समस्या यांमध्ये ताळमेळ न जुळल्याने महिला खेळाडूंचे प्रचंड नुकसान होते. त्यातही मुलगी दलित वगैरे असली आणि मोठ्या स्तरावर नावाजली गेली तर तिच्या सात पिढ्यांचा उद्धार झालेला दिसतो. ऑलिम्पिक मध्ये महिला हॉकी संघातून गोलची हॅट्रीक करणाऱ्या वंदना कटारिया चा संघ अर्जेंटिना

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.67
Volume 5, Issue 5, February 2025

विरूद्ध हरला ; तेंव्हा त्या हरण्याचे खापर वंदनाच्या जातीवर फोडून तिच्या गावातील लोकांनी तिच्या घरासमोर हैदोस घातला. एका दलित मुलीचं यश उच्चवर्णीय वर्चस्ववादी समाज पाहू शकत नाही. बॉक्सर थुलसी हेलन या दलित स्त्रीलाही अश्याच अपमानाला सामोरे जावे लागले. महिला खेळाडूंचे 'यौन शोषण' हे तर छुपे सत्य आहे. महिला कुस्ती संघाचे तत्कालिन अध्यक्ष व भाजपचे खासदार बृजभूषण शरण सिंह यांच्यावर ऑलिम्पिक मेडल विजेता साक्षी मलिक तसेच विनेश फोगाट व बजरंग पुनीया यासारख्या दिग्गज महिला खेळाडूंनी 'यौन शोषनाचा' आरोप लावत 'दिल्ली' येथील जंतर-मंतरवर आंदोलन केले. पण सत्ताधारी सरकारचा विश्वस्त असल्याने बृजभूषणवर काही कार्यवाही झाली नाही. पुढे साक्षी मलिक ने 'संजय सिंह' यांची कुस्ती संघाच्या अध्यक्षपदी निवड होताच खेळातून सन्यास घेतला. कुस्तीचे भविष्य व आदर्श असलेल्या साक्षी च्या संघर्षात तिला भक्कम साथ कोणाचीही मिळाली नाही.

देशाच्या उत्तर पूर्व भागातून येऊन मिराबाई चानू सारख्या, पी. व्ही. सिंधू सारख्या मुली ऑलिम्पिक मध्ये देशाचं नाव गाजवतांना दिसताहेत. मेरी कोम हिने बॉक्सिंग मध्ये मिळवलेलं यश सर्वश्रृतच आहे. भरपूर कष्ट करणाऱ्या या मुलींना योग्य प्रशिक्षण आणि सोयी मिळाल्या तर... आणि सर्वतऱ्हेची विषमता खेळांतून हद्दपार झाली तर....

हा 'तर' संपेल तेंव्हाच हा देश शाश्वत विकासाच्या दिशेने आपले पाऊल टाकण्यास सज्ज होऊ शकेल. मुलांच्या सर्वांगीण वाढीसाठी, एका सुयोग्य, निरोगी पिढीसाठी 'खेळ' व 'खेळभावना' या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत ; नव्हे अनिवार्य आहेत.

**निष्कर्ष :**

1) 'क्रिकेट' हा खेळ सामान्य घरातील मुलही खेळू शकतील व त्यात नाव कमवू शकतील हा आत्मविश्वास सचिन तेंडुलकरने मिळवून दिला.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.67
Volume 5, Issue 5, February 2025

2) योग्य प्रशिक्षक, मार्गदर्शक, आहार, फिटनेस व नैतिकता ह्या गोष्टी खेळाडूंसाठी आवश्यक आहेत.

3) बजेट मध्ये खेळांसाठी आर्थिक तरतूद ही भक्कम असली पाहिजे.

4) खेळातील राजकारण, भ्रष्टाचार, जातीयता व यौन शोषण यामुळे भारतीय खेळांचे अध:पतन झाले आहे.

5) देशाच्या शाश्वत विकासात खेळ व खेळाडूंची महत्वाची भूमिका आहे.

संदर्भसूची :

[1].संझगिरी द्वारकानाथ, खेलंदाजी, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., प्र. आ. 2022, पृ.क्र.16

[2].संझगिरी द्वारकानाथ, खेलंदाजी, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., प्र. आ. 2022, पृ. क्र. 27

[3].संझगिरी द्वारकानाथ, खेलंदाजी, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. प्र. आ. 2022, पृ. क्र. 93

[4].संझगिरी द्वारकानाथ, खेलंदाजी, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. प्र. आ. 2022, पृ. क्र. 94

[5].संझगिरी द्वारकानाथ, खेलंदाजी, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. प्र. आ. 2022, पृ. क्र. 132